पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला
(महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर)
कृषि नगर, अकोला ४४४१०४ (महाराष्ट्र, भारत)
COLLEGE OF VETERINARY AND ANIMAL SCIENCES, AKOLA
(MAHARASHTRA ANIMAL AND FISHERY SCIENCES UNIVERSITY, NAGPUR)
Krishi nagar, Opposite Dr. PDKV Campus, Murtijapur Road, Akola 444 104 (Maharashtra, India) ☎ : 0724-2258865 Website: www.covasaklmafsu.ac.in, e-mail: adpgivas@mafsu.ac.in,

No. COVAS/AD/Cattle Feed/Quotation/ 1373 /2025
Date: 03/10/2025

प्रती,

मा. सहयोगी अधिष्ठाता,
नागपुर पशुवैद्यक महाविद्यालय,
नागपुर.

**विषय : नापवैम अधिनस्त व्यावसायिक पशुखाद्य निर्मिती यंत्रणेमार्फत दुधाळ गाई, म्हशी व कालवडींचे तयार खाद्याच्या खरेदीच्या अनुषंगाने उपलब्धते व दरपत्रकाची माहिती पुरविणे बाबत ...**

महोदय,

दि. ०२/१०/२०२५ रोजी आपले महाविद्यालय अधिनस्त पशुपोषण विभागामार्फत दुधाळ जनावरांसाठी मिल्क रेशन (Milk Ration) व कालवडींसाठी पोषक खाद्याचे (Calf Starter) व्यावसायिक पशुखाद्य निर्मिती सयंत्रणेचे मा. कुलगुरू, मपमविवि, नागपुर ह्यांचे शुभहस्ते उद्घाटन झाल्याचे माहितीस आलेले आहे.

या अनुषंगाने उपरोक्त विषयास अनुसरून आपणास माहितीस आणून देण्यात येत आहे की, पशुधन प्रक्षेत्र संकुल विभाग (बोरगाव मंजु प्रक्षेत्र), पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय अकोला अंतर्गत पूर्णाथडी जातीच्या म्हशी व गोवंशीय जनावरांची जोपासना करण्यात येते. सध्यास्थितीत प्रक्षेत्रावर महिषवर्गीय ३५ जनावरे (०१ नर, ११ वयस्क म्हशी, ०७ वगारी/heifer, ०७ नर वासरे व ०९ मादी वासरे) व गोवंशीय ०८ (०३ बैल, ०३ गायी व दोन कालवडी) जनावरे सध्यस्थितीत उपलब्ध आहेत.

सदर उपलब्ध पशुधनास दुधाळ जनावरांसाठी साधारणपणे दर महिन्यात २०००-२५०० किलो तयार पशुखाद्य तसेच उपलब्ध कालवडींसाठी ५०० किलो खाद्याची आवश्यकता असते.

करिता, आपले अधिनस्त व्यावसायिक पशुखाद्य निर्मिती यंत्रणेमार्फत उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे बोरगाव मंजु प्रक्षेत्रावर पशुखाद्याची पूर्तता होऊ शकते का? तसेच, सदर पशुखाद्याचे दरपत्रक पुरविण्यात यावे ही विनंती जेणेकरून या महाविद्यालयास पुढील कार्यवाही करणे सोयीचे होईल.

करिता आपले माहितीस सादर.

सहयोगी अधिष्ठाता
सहयोगी अधिष्ठाता
पशुवैद्यकीय व पशुविज्ञान महाविद्यालय,
अकोला

प्रत महितीस्तव सविनय सादर :

मा. संचालक संशोधन, महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपुर

Scanned with OKEN Scanner